आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१२ फेब्रुवारी २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांचा पक्ष सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा
- राज्यातल्या शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये बदल घडवण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून ४ हजार कोटी रुपये मंजूर
- रोजगार मेळाव्याअंतर्गत केंद्र सरकारच्या विविध आस्थापनांमध्ये नव्यानं भर्ती झालेल्या एक लाखाहून अधिक उमेदवारांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वाटप

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात ५२३ अंकांची घसरण

**<><><><><>**

माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी आज पक्ष सदस्यत्व, काँग्रेस कार्यकारिणीसह आमदारकीचा राजीनामा दिला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आमदारकीचा राजीनामा स्वीकारला आहे.

आगामी राजकीय वाटचालीचा निर्णय अजून घेतलेला नसून येत्या २ दिवस निर्णय जाहीर करु असं ते मुंबईत वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. काँग्रेस पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देण्याचं कारण सांगायला त्यांनी नकार दिला. पक्षांतर्गत बाबी जाहीरपणे बोलणार नसल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांच्यासह अन्य काही आमदार राजीनामा देणार अशी चर्चा होती. मात्र अनेक जणांनी हे वृत्त फेटाळून लावलं आहे तसंच चव्हाण यांच्याशिवाय अन्य कुठल्याही आमदाराचा राजीनामा मिळाला नसल्याचं नार्वेकरांनी स्पष्ट केलं.

काँग्रेस पक्ष संविधान आणि लोकशाही वाचविण्याची लढाई लढत असताना सर्वकाही मिळालेले नेते काँग्रेस पक्षाला आणि विचारधारेला सोडून जात आहेत हे दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. काँग्रेसचे बहुतांश आमदार आमच्या संपर्कात आहे. हे सर्व आमदार उद्या मुंबईत येणार आहे. बुधवारी आणि गुरुवारी विधीमंडळ पक्षाची बैठक होईल, असं माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितलं.

मुंबई महापालिकेतल्या दोन माजी नगरसेवकांनी आज दुपारी भाजपामध्ये प्रवेश केला. विरोधी पक्षांचे काही चांगले नेते भाजपाच्या संपर्कात असल्याचं यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. अशोक चव्हाण यांना राज्यसभा उमेदवारी देण्याचा या क्षणी कोणताही प्रस्ताव नसल्याचं भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आज नागपुरात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. भाजपाकडे तीन जागा जिंकण्याचं बहुमत आहे. एक-एक जागा एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना मिळेल. त्यामुळं राज्यसभा निवडणूक फार संघर्षाची होणार नाही, असंही ते म्हणाले.

काँग्रेस पक्ष सोडल्याबद्दल चव्हाण यांचं रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी अभिनंदन केलं आहे. त्यांना महायुतीसह रिपब्लिकन पक्षात प्रवेशाचं आमंत्रण त्यांनी दिलं.

**<><><><><>**

राज्यातल्या शासकीय रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आशियाई विकास बँकेनं ४ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यात १ हजार २०० कोटी रुपये मिळणार आहेत. राज्यातल्या आकांक्षित जिल्ह्यांमध्ये अद्ययावत आणि दर्जेदार जिल्हा रुग्णालयं

उभारण्यासाठी हा निधी खर्च करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

सुरुवातीला धाराशिव जिल्ह्यात सर्वसुविधायुक्त ५०० खाटांचं अद्यावत जिल्हा रुग्णालय उभारण्याची तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

<><><><><>

मराठा समाजाचा ओबीसींमध्ये सरसकट समावेश करण्याच्या प्रक्रियेतल्या सगेसोयरे या शब्दाच्या व्याख्येबाबत राज्य सरकारनं काढलेल्या अधिसूचनेच्या मसुद्यावर हरकत नोंदवण्यासाठी मुदतवाढ द्या, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे. त्यांनी राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांना पत्र दिलं आहे. ही अधिसूचना २६ जानेवारीला जारी केली होती. हरकत नोंदवण्यासाठी १६ फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली आहे. कोणत्याही कायदेशीर मसुद्यावर हरकत नोंदवायला ३० दिवसांची मुदत असते, या नियमाकडे भुजबळ यांनी या पत्राद्वारे लक्ष वेधले आहे. हरकतींसाठी १६ फेब्रुवारी पासून किमान १५ दिवसांची मुदतवाढ द्यावी अशी त्यांची मागणी आहे.

<><><><><>

नांदेड महापालिका क्षेत्रात विकसित भारत संकल्प यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याचा आज समारोप झाला. तिथल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थी वंदना पंडित यांनी सांगितलं…

**होल्ड - बाईट - वंदना पंडित**

<><><><><>

तरुणांना आपली क्षमता दाखवण्याची समान संधी मिळावी, यासाठी सरकार निश्चित कालावधीत भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज रोजगार मेळाव्याअंतर्गत केंद्र सरकारच्या विविध आस्थापनांमध्ये नव्यानं भरती झालेल्या एक लाखाहून अधिक उमेदवारांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून नियुक्तीपत्रांचं वाटप केलं तेव्हां ते बोलत होते. सरकारनं भरती प्रक्रिया पारदर्शक केली असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या कार्मिक विभागाची नवी वास्तू कर्मयोगी भवनच्या पहिल्या टप्प्याची पायाभरणी यावेळी प्रधानमंत्र्यांनी केली.

देशभरात ४७ ठिकाणी हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपूर जिल्ह्याच्या हिंगणा इथल्या केंद्रीय राखीव पोलीस बल ग्रुप सेंटर मध्ये एकूण ११९ नवनियुक्तांना नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यातं आलं.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज दिवसअखेर ५२३ अंकांची घसरण झाली, आणि तो ७१ हजार ७२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६६ अंकांची घट नोंदवत २१ हजार ६१६ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी निवडणूक यंत्रणेला आवश्यक मनुष्यबळ तातडीनं वर्ग करायची सूचना केंद्रीय निवडणूक उपायुक्त हिरदेश कुमार यांनी आज केली. त्यानुसार लवकरच मनुष्यबळ पुरवण्याचं आश्वासन बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इक्बाल सिंग चहल यांनी दिलं. मुंबईतल्या निवडणूक पूर्वतयारीचा आढावा आजच्या बैठकीत झाला. बैठकीला पोलिस आयुक्तांसह अनेक

वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर हिरदेश कुमार यांनी धारावीत तसंच ५० पेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या संक्रमण शिबीर मनपा शाळेला भेट देऊन, मतदान केंद्रांच्या नियोजनाची पाहणी केली.

**<><><><>**

बिहार विधानसभेत नीतिश कुमार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं आज विश्वासदर्शक ठराव जिंकला. या ठरावाला १२९ सदस्यांनी पाठिंबा दिला. राजद, काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी मतदानावर बहिष्कार टाकला. २४३ सदस्यांच्या बिहार विधानसभेत रालोआला भाजप, संयुक्त जनता दल, हिंदुस्थानी अवाम मोर्चाच्या सदस्यांसह एका अपक्ष आमदारांचा तर राजद आणि काँग्रेसयुतीला ११४ आमदारांचा पाठिंबा होता. बहुमत सिद्ध करण्यासाठी १२२ चा आकडा पार करायची गरज होती. अधिवेशनाच्या आजच्या पहिल्या दिवशी अध्यक्ष अवध बिहारी चौधरी यांच्याविरुद्ध भाजपा आणि जेडीयू सदस्यांनी आणलेला अविश्वास प्रस्तावही संमत झाला. उपाध्यक्ष माहेश्वर हजारी यांनी सभागृहाचं कामकाज पाहिलं.

**<><><><>**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक पुरस्कारांचं वितरण उद्या मुंबईत होणार आहे. संत साहित्याच्या प्रसारासाठी दिला जाणारा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार,तसंच, शास्त्रीय संगीत, रंगभूमी, संगीत रंगभूमी आणि तमाशा या क्षेत्रातले जीवनगौरव पुरस्कार या कार्यक्रमात सन्मानमूर्तींना प्रदान केले जातील. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार असल्याचं सांस्कृतिक कार्य संचालनालयाने म्हटलं आहे.

**<><><><>**

ज्यांनी पक्षाची स्थापना केली त्यांच्या हातातून पक्ष काढून निवडणूक आयोगाने दुसऱ्यांना दिला, असं देशात याआधी घडलेलं नव्हतं ते आयोगानं करून दाखवलं, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते पुण्यात पक्षाच्या डॉक्टर सेलच्या मेळाव्या दरम्यान बातमीदारांशी बोलत होते.

बारामतीचे लोक शहाणे आणि समंजस असून वर्षानुवर्ष कुणी काम केलं आहे हे बारामतीकरांनी पाहिलं आहे, ते आगामी निवडणुकीत योग्य निर्णय घेतील, आपण निवडणुकीला उभा राहणार नसल्यामुळे बारामतीमध्ये भावनिक आवाहन करण्याचं कारण नाही, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ग्रामीण भागापर्यंत विश्वकर्मा योजना प्रभावीपणे पोहचवण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करणार असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज दिली. नवी मुंबईत बेलापूर इथल्या कोकण भवन विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. पुणे इथल्या खादी ग्रामोद्योग मंडळाच्या हात कागद संस्थेसाठी १ कोटी रुपये आणि खादी भवनाच्या इमारत दुरुस्तीसाठी २ कोटी रुपये अनुदान देण्याला सामंत यांनी तत्वत: मान्यता दिली.

यावेळी नैना परिक्षेत्रातल्या समस्यांबाबत सर्व पक्षीय बैठक झाली. या परिक्षेत्रातल्या गावांना एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि संवर्धन विनियमन लागू करण्याबाबत शासन सकारात्मक विचार करेल, असं आश्वासन सामंत यांनी दिलं.

**<><><><><>**

नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गावर जालना हद्दीतल्या जामवाडी शिवारात आज पहाटे एका रुग्णवाहिकेचा अपघात झाला, त्यात दोन जणांचा मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले. हे सर्वजण उत्तर प्रदेशातले असून, जखमींवर जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रुग्णवाहिका मुंबईच्या सायन रुग्णालयातून एक मृतदेह घेऊन उत्तर प्रदेशाकडे जात असताना ही दुर्घटना झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

गडचिरोलीत जिल्हाधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानी राज्य राखीव दलाच्या सुरक्षा रक्षकाने आज सकाळी आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

<><><><><>

विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी काल पाऊस पडला. मराठवाड्यात आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसात राज्यात हवामान प्रामुख्यानं कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//